महा मेट्रो

PUNE METRO

# महा मेट्रोला 15 व्या UMI मध्ये दुसरा सर्वोत्कृष्ट प्रदर्शक पुरस्कार मिळाला




पुणे: महा मेट्रोला कोची, केरळ येथे 15 व्या अर्बन मोबिलिटी इंडिया (UMI) राष्ट्रीय परिषदेत `सर्वोत्कृष्ट प्रदर्शक' श्रेणीमध्ये द्वितीय पारितोषिक देण्यात आले आहे.महामेट्रोतर्फे कोची येथे उभारलेल्या स्टॉलला आज हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्री दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या शेवटच्या दिवशी हे पुरस्कार देण्यात आले.

मेक इन इंडिया ही या स्टॉलची थीम होती आणि त्या अनुषंगाने मेक इन इंडिया अल्युमिनियम बॉडी कोचची माहिती यांसारखे विषय प्रदर्शित करण्यात आले. या व्यतिरिक्त, महा मेट्रोने नागपूर आणि पुणे येथील विविध कामगिरीचे चित्रण केले आहे, ज्यात मालमत्ता विकास (पीडी), आर्थिक शाश्वतता, पावसाचे पाणी साठवणे यासारख्या गोष्टींचा समावेश आहे.




मेट्रो प्रकल्पाची उपयुक्तता सर्व सामान्यांना समजावण्याकरता आयोजित होत असलेले मेट्रो संवाद, मेट्रोनियो प्रकल्प, महा मेट्रोने आजवर मिळवलेले विविध पुरस्कार असे काही निवडक विषय छायाचित्राच्या माध्यमाने प्रदर्शित केले आहेत. परिषदेच्या तीनही दिवशी या स्टॉलला चांगला प्रतिसाद मिळाला असून चांगल्या संख्येने नागरिकांनी या स्टॉलला भेट दिली.




हा काही पहिलाच प्रसंग नाही आणि याआधीही महा मेट्रोच्या स्टॉल्सची निवड अशाच प्रकारच्या परिषदेत बेस्ट एक्झिबिटर पुरस्कारासाठी करण्यात आली आहे. प्रदर्शनासाठी निवडलेले विविध विषय आणि UMI येथे प्रसारित केलेल्या माहितीसाठी महा मेट्रोची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. आज झालेल्या पुरस्कार सोहळ्यात महा मेट्रोच्या वतीने संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) श्री अनिल कोकाटे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.